# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

मुख्य कार्यालय

बँक ऑफ इंडिया इमारत, 3 रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई 400001 2267 0210 /148 /248,22102222 फॅक्स : 22673915

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 2267 0210 /148 /248, 22102222 Fax : 22673915

माझगांव कार्यालय

विक्रीकर भवन, 9 वा मजला,रुम नंबर 915, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव, मुंबई 400203 23742191 फॅक्स : 23781061

Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balvantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai 400203 23742191 Fax : 23781061

ई-मेल sec_mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट– www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in


## विक्रीकर निरीक्षक (मुख्य) परीक्षा -२०११

**अधिसूचना क्रमांक १४४२(२)(२)/२०११/तीन**

जाहिरात क्रमांक ८३/२०११, दि. १० ऑगस्ट, २०११ नुसार राज्य शासनाच्या सेवेतील **विक्रीकर निरीक्षक** पदांवरील नियुक्तीकरिता आयोगामार्फत दि. **२५ सप्टेंबर, २०११** रोजी घेण्यात आलेल्या **विक्रीकर निरीक्षक (पूर्व) परीक्षा - २०११** च्या निकालाआधारे मुख्य परीक्षेसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची **विक्रीकर निरीक्षक (मुख्य) परीक्षा -२०११ रविवार दिनांक ११ डिसेंबर, २०११** रोजी **औरंगाबाद, मुंबई, नागपूर व पुणे** या केंद्रांवर घेण्यात येईल.

**२. उपलब्ध पदसंख्या** :-

| अ. क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | वि. मा. प्र. | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ. मा. व. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | विक्रीकर निरीक्षक (एकूण पदे १६८) | ८४ | १५ | १८ | ३ | ६ | २ | ७ | ४ | २९ |
| | महिला - | २५ | ५ | ५ | १ | २ | १ | २ | २ | ८ |
| | खेळाडू - | ४ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | २ |
| | अपंग- | अंधत्व किंवा क्षीण दृष्टी -१ पद, श्रवणशक्तीतील दोष -२ पदे, चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - २ पदे | | | | | | | | |

**२.१** महिला व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे त्या त्या संवर्गाच्या एकूण पदसंख्येपैकी आहेत.

**२.२** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.३** अपंगांसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

**२.४** उपरोक्त सर्व पदांना विभागीय संवर्ग, संरचना व विभागीय संवर्ग वाटप नियमावली २०१० लागू आहे.

**३. परीक्षेचे टप्पे**

**३.१** सदर परीक्षा खालील दोन टप्प्यांत घेण्यात येईल :-

(अ) **लेखी परीक्षा** :- **४०० गुण.**

(ब) **मौखिक व व्यक्तिमत्व चाचणी** :- **५० गुण.**

**४. शुल्क** :-

**४.१** अमागास - रुपये ३१०/- ४.२ मागासवर्गीय - रूपये १६०/-

**४.३** सदर शुल्क ऑनलाईन माहितीची नोंदणी केल्यावर प्राप्त होणा-या विहित चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल.

**४.४** बँकेमध्ये रक्कम भरल्यानंतर बँकेकडून चलनावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या Transaction ID ची नोंद पुन्हा ऑनलाईन पध्दतीने अचूकरित्या केल्याशिवाय माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण होणार नाही.

५. **मुख्य परीक्षेस प्रवेश :-**

**५.१** विक्रीकर निरीक्षक (पूर्व) परीक्षा - २०११ च्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या आणि पूर्व परीक्षेच्या जाहिरातीत नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची मुख्य परीक्षेसाठी अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास म्हणजेच **दिनांक ३० नोव्हेंबर, २०११** रोजी किंवा त्यापूर्वी पूर्तता करणा-या उमेदवारास मुख्य परीक्षेसाठी पात्र समजण्यात येईल.

**५.२** जे उमेदवार पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करताना जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे विहित शैक्षणिक अर्हता धारण करीत नव्हते, परंतू दिनांक **३० नोव्हेंबर, २०११** रोजी किंवा त्यापूर्वी शैक्षणिक अर्हता धारण करीत आहेत, अशा उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक ऑनलाईन पध्दतीने दिनांक **३० नोव्हेंबर, २०११** पर्यंत नोंदविणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्यांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**५.३** पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनी आयोगाच्या www.mpsconline.gov.in या वेबसाईटवर स्वतःच्या युजर आयडी व पासवर्डद्वारे प्रवेश (Login) केल्यानंतर Apply Exam / Post या बटनावर क्लिक करावे. त्यानंतर विक्रीकर निरीक्षक (मुख्य) परीक्षा - २०११ वर Apply केल्यावर उमेदवारास त्याच्या पसंतीचे परीक्षा केंद्र (औरंगाबाद, मुंबई, नागपूर, पुणे) निवडल्यानंतर, दिनांक व ठिकाण नमूद केल्यावर Submit to MPSC वर क्लीक करुन आयोगास माहिती सादर करावी. पात्र उमेदवारांनी मुख्य परीक्षेकरीता परीक्षा केंद्र व परीक्षा शुल्काचा भरणा करण्यासाठी चलन घेण्याची कार्यवाही **३० नोव्हेंबर, २०११** पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे.

**५.४** वरीलप्रमाणे आयोगास माहिती सादर केल्यानंतर विहित परीक्षा शुल्काचा भरणा करण्यासाठी Print Challan या बटनावर क्लिक करावे व चलनाची प्रत घ्यावी. सदर चलनावर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक परीक्षा शुल्क चलनासह भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत बँकेच्या कार्यालयीन वेळेत रोखपालाकडे सादर करावे व बँकेकडून त्याच वेळी चलनाची प्रत घ्यावी.

**५.५** बँकेमध्ये विहित परीक्षा शुल्काचा चलनाद्वारे भरणा केल्यानंतर चलनावर प्राप्त झालेल्या Transaction ID ची नोंद खालीलप्रमाणे करावी :-

(१) बँकेमध्ये रकमेचा भरणा केल्यावर शासकीय कार्यालयीन कामकाजाच्या दोन दिवसानंतर स्वतःच्या युजर आयडी व पासवर्डद्वारे प्रवेश (Login) करुन Apply Exam / Post या बटणावर क्लिक करावे व Update Transaction ID या बटणावर क्लिक करुन बँकेकडून प्राप्त झालेला Transaction ID अचूकपणे नोंदवावा. बँकेकडून प्राप्त झालेल्या Transaction ID ची नोंद अचूकपणे करण्यात आली असेल तरच उमेदवार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरेल व पुढील प्रक्रिया करता येईल. अन्यथा पुढील कोणतीही कार्यवाही होऊ शकणार नाही.

(२) Transaction ID ची नोंद अचूकपणे केल्यानंतर व नोंदविलेला Trasaction ID वैध असल्यास उमेदवाराला संबंधित जिल्हाकेंद्रावरील आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल.

(३) प्रस्तुत परीक्षेच्या अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर एक सप्ताहामध्ये उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्राची प्रत त्याच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने डाऊनलोड करुन घेणे आवश्यक आहे.

(४) परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

(५) प्रस्तुत परीक्षेच्या प्रवेशासाठी ऑनलाईन पद्धतीने माहिती सादर करणाऱ्या उमेदवारांना अर्जाची प्रत अथवा कोणत्याही प्रकारची कागदपत्रे अथवा ऑनलाईन अर्ज प्रणालीमध्ये असलेल्या शपथपत्राव्यतिरिक्त कोणतेही वेगळे शपथपत्र (Affidavit) आयोगाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही.

६. विहित पद्धतीने परीक्षा केंद्र निवडून परीक्षा शुल्क **भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक ३० नोव्हेंबर,२०११ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे.** त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल. **चलनाद्वारे शुल्क भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक १ डिसेंबर, २०११ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील.**

७. चलनाद्वारे शुल्क भारतीय स्टेट बँकेमध्ये भरल्यानंतर **बँकेकडून प्राप्त होणारा Transaction ID दिनांक ३ डिसेंबर, २०११ रोजी २३.५९ वाजेपर्यंत अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे.** त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

८. Transaction ID ची नोंद अचूकरित्या,विहित पद्धतीने व विहित कालावधीत न करणाऱ्या उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

९. प्रस्तुत पदाच्या परीक्षेचा अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

१०. सदर अधिसूचना आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

मुंबई :
दिनांक : २४ नोव्हेंबर, २०११

**सु. ना. हनुमंते**
उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात, तसेच, शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.(२) मुलाखतीच्या वेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल.**